CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २४१ वा ▶ मंगळवार दि. २७ जून २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

के. चंद्रशेखर राव अख्ख्या मंत्रिमंडळासह महाराष्ट्रात

मुंबई । तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी महाराष्ट्रावर संपूर्ण लक्ष केंद्रीत केलं आहे. तेलंगणात सत्ता आल्यानंतर आता महाराष्ट्रात आपलं राजकीय अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न चंद्रशेखर राव यांनी सुरू केला आहे. राज्यातील काही नेते चंद्रशेखर राव यांच्या गळालाही लागेल आहेत. मात्र, त्यांना अजूनही राज्यातील म्हणावा तसा मोठा नेता मिळालेला नाही. या संपूर्ण पार्श्वभूमीवर चंद्रशेखर राव दोन दिवसाच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहेत.

न्यूज कॉलम

गळा चिरलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

नाशिक । दिवसेंदिवस नाशिक शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशातच आता शहरातील सातपूर परिसरात एका परप्रांतीय महिलेची हत्या झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. सातपूरमधील विधाते गल्लीयेथे राहत्या घरात एक महिला गळा कापलेल्या अवस्थेत आढळून आली आहे. या घटनेची माहिती तात्काळ सातपूर पोलिसांना कळविण्यात आली असून पोलीस घटनास्थळाचा पंचनामा करत आहे. दरम्यान, या महिलेची हत्या आहे की आत्महत्या हे अद्याप समजलेले नसून ते चौकशीनंतर निष्पन्न होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी काही संशयित तरुणांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे.

प्रवासी भरण्याच्या वादातून एकास मारहाण

शिरपूर । खासगी प्रवासी वाहनात प्रवासी बसविण्याच्या कारणावरून चालकाला लोखंडी पाइपाने बेदम मारहाण करून जखमी केल्याची घटना २३ जूनला शहरातील गुजराथी कॉम्प्लेक्ससमोर घडली. प्रवीण परशराम गोपाळ असे जखमी चालकाचे नाव आहे.

मी सरकार बदलले तेव्हा देवेंद्र फडणवीस प्राथमिक शाळेत त्यांना इतिहास माहित नसेल; पवारांचा खोचक टोला

मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी १९७७ मधील घडामोडींचा संदर्भ देताना पवार साहेबांनी जे केलं ते मुत्सद्देगिरी आणि तेच एकनाथ शिंदे यांनी केलं तर गद्दारी? असं वक्तव्य केलं होतं. त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारयांनी खोचक शब्दात उत्तर दिलं आहे. १९७७ साली आम्ही सरकार बनवलं पण त्यावेळी भाजप माझ्यासोबत होते. त्यावेळी फडणवीस कदाचित प्राथमिक शाळेत असतील. त्यामुळे त्यांना त्या काळातील त्यांना काही माहिती नसेल. अज्ञातापोटी ते असं स्टेटमेंट करतात, असं शरद पवार म्हणाले. बारामतीमध्ये माध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी विरोधकांच्या बैठकीसह देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. सोबतच राष्ट्रवादीमधील बदलांबाबतही भाष्य केलं.

देवेंद्र फडणवीस म्हणतात एकनाथ शिंदेंनी केली तर बेईमानी आणि पवारसाहेबांनी केली तरी मुत्सद्देगिरी? असा सवाल विचारला असता शरद पवार म्हणाले की, कधी केली पवारांनी? कधी केली हे त्यांनी सांगावं. १९७७ साली आम्ही सरकार बनवलं पण त्यावेळी भाजप माझ्यासोबत होते. ते लहान होते त्यावेळी, त्यामुळे त्यांना कळलं नसेल. त्यांना कदाचित पूर्वीचा इतिहास माहित नसेल. पण त्यांच्या माहितीसाठी सांगतो, मी जे सरकार बनवलं ते सगळ्यांना सोबत घेऊन बनवलं. त्यावेळी जनसंघाचे उत्तमराव पाटील हे उपमुख्यमंत्री होते. त्यानंतर हशू अडवाणी होते आणि काही सदस्य होते. त्यावेळी ते प्राथमिक शाळेत कदाचित असतील. त्यामुळे त्यांना त्या काळातील त्यांना काही माहिती नसेल. अज्ञातापोटी ते असं स्टेटमेंट करतात, यापेक्षा जास्त भाष्य करण्याची गरज नाही. बिहारच्या पाटण्यात पार पडलेल्या विरोधकांच्या बैठकीवर भाजपकडून जोरदार टीक करण्यात येत आहे. १९ पंतप्रधान एकत्र आले होते, असा टोला भाजपने लगावला होता. यावर प्रतिक्रिया देताना अशाप्रकारची भाष्य करणं पोरकटपणा आहे. या संबंध बैठकीत पंतप्रधानपदावर चर्चा देखील झाली नाही. महागाई, बेरोजगारी आणि धार्मिक तेढ या मुद्द्यांवर चर्चा झाली, असं पवारांनी सांगितलं. तसंच लोकशाहीत बैठक घ्यायला परवानगी नाही? असा सवालही शरद पवार यांनी विचारला आहे. गेले दोन दिवस अनेक तथाकथित नेते हे लोक जमले का, त्यांनी बैठक का घेतली, लोकशाहीत बैठक घ्यायला परवानगी नाही? भाजप प्रदेशाध्यक्षांचं वक्तव्य आलं की बैठकांची गरज का होती. दुसऱ्या दिवशी त्यांचं वक्तव्य आलं की मुंबईत त्यांच्या मित्रपक्षांची बैठक ते घेणार आहेत. तुम्हाला बैठक घेता येतात पण इतरांनी बैठका घेतल्या तर तुम्हाला चिंता का वाटते. माझ्या मते मॅच्युअर पॉलिटिक्स म्हणतात त्याची कमतरता यापेक्षा जास्त काही सांगायची गरज नाही.

गद्दारी कुणी केली?

पत्रकार परिषदेत शरद पवारांनी या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले. शरद पवार म्हणाले, मी गद्दारी कशी केली, हे फडणवीसांनी सांगावे. १९७७ला आम्ही राज्यातील सरकार बदलले होते. त्याला भाजपनेही पाठिंबा दिला होता. फडणवीस लहान होते. त्यामुळे त्यांना ही माहिती नसेल. शरद पवार म्हणाले, आम्ही सर्वांना सोबत घेऊन सरकार बनवले होते. त्यात जनसंघाचे उपमुख्यमंत्री होते. काही सदस्यही होते. आम्ही हे केले तेव्हा देवेंद्र फडणवीस प्राथमिक शाळेत असतील.

त्यांचे वाचन किती? - फडणवीसांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ओबीसींना नेतेपदी स्थान दिले जात नाही, असाही आरोप केला आहे. त्याला प्रत्युत्तर देताना शरद पवार म्हणाले, अशी टीका करून ते आपले अज्ञान पुन्हा समोर आणत आहे.

फडणवीस काय म्हणाले होते?

चंद्रपूरमध्ये मोदी सरकारच्या ९ वर्षपूर्तीनिमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीसांनी शरद पवारांचा उल्लेख करत १९७७ च्या घडामोडींचा संदर्भ दिला. देवेंद्र फडणवीसांनी शरद पवारांना लक्ष्य करताना १९७७ साली त्यांनी स्थापन केलेल्या सरकारचा संदर्भ दिला. शरद पवार हे वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळातील ४० आमदार घेऊन बाहेर पडले होते. त्यांनी तेव्हाच्या भाजपाबरोबर सरकार स्थापन केलं. ते सरकार दोन वर्षं चाललं. पंतप्रधान इंदिरा गांधींनी ते सरकार बरखास्त केलं नसतं तर ते सरकार पाच वर्षं चाललं असतं. म्हणजे तेव्हा पवारसाहेबांनी जे केलं ते मुत्सद्देगिरी आणि तेच एकनाथ शिंदे यांनी केलं तर गद्दारी? असं कसं चालेल? असा सवाल देवेंद्र फडणवीसांनी उपस्थित केला होता.

बावनकुळेंचे पोरकट राजकारण

पाटणा येथे झालेल्या विरोधकांच्या बैठकीवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सडकून टीका केली आहे. विरोधकांना एकत्र बैठक घेण्याची गरज का पडली, असा सवाल बावनकुळेंनी केला. त्यावर शरद पवार म्हणाले, अशा प्रकारचे भाष्य करणे हे पोरकटपणाचे आहे. आमच्या बैठकीत पंतप्रधान पदावर कोणतीही चर्चा झाली नाही. जाती-धर्मांवरुन निर्माण करण्यात येणाऱ्या तणावाला रोखण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. पाटण्यात बैठक होताच मुंबईत भाजपने मित्रपक्षांची बैठक घेतली. म्हणजे तुम्ही बैठक घेतली तर चालते आणि इतरांनी बैठक घेतली तर टीका करायची हे परिपक्व राजकारण नाही.

धुळे एमआयडीसीत अग्निशमन केंद्राचा फारूक शाह यांचे हस्ते शुभारंभ

धुळे । प्रतिनिधी

येथील अवधान शिवारात असलेला एमआयडीसीःचा विस्तार वाढत असून एमआयडीसी भागात अग्नीपासून सुरक्षेचे कोणतेच साधन उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्या भागात कारखान्यांना आगी लागण्याच्या घटना घडत होत्या. त्यामुळे व्यापारीवर्गाचे करोडो रुपयांचे नुकसान होत होते. म्हणून सुसज्ज अग्निशमन केंद्राची अत्यंत गरज होती. त्यादृष्टीने धुळ्यातील उद्योजकांनी आ.फारुख शाह यांचेकडे सुसज्ज अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी केली होती. त्यानुसार ही बाब आ.फारुख शाह यांनी उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांच्या निदर्शनास आणून दिली.

आ.शाह यांची मागणी लक्षात घेवून उद्योग मंत्र्यांनी निधी मंजूर केला गेल्या काही दिवसांपूर्वी मधुर इंडस्ट्रीज आणि केशरानंद जिनिंगला मोठ्या प्रमाणात आग लागली होती. या ठिकाणी धुळे महानगरपालिकेतून अग्निशमन दलाच्या गाड्या बोलावल्या होत्या. परंतु धुळे शहरातून एमआयडीसीकडे जाणारा रस्ता हा खूप जास्तीचा वर्दळीचा व शहरापासून १० किमी अंतराचा असल्यामुळे अग्निशमनची गाडी वेळेवर घटनास्थळी पोहचली नाही. परीणामी मोठ्या प्रमाणात उद्योजकांचे नुकसान झाले होते. या ठरावाचे पत्र एमआयडीसी प्रशासनाला दिल्यानंतरही सहा वर्षाचा कालावधी उलटला असूनही फायर स्टेशन झाले नव्हते. या फायर स्टेशन मध्ये दोन फायर फायटर वाहनांसहित अन्य साधने राहणार आहेत. तसेच आमदार फारूक शाह यांच्या प्रयत्नाने सुसज्ज अशा विभागीय कार्यालय इमारतीसाठी सुद्धा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून काम सुद्धा लवकरच सुरु होणार आहे, या कार्यक्रमाला आ.शाह यांचे सोबत हाजी छोटू शाह, नगरसेवक आमिर पठाण, प्यारेलाल पिंजारी, निजाम सय्यद, एमआयडीसीचे अभियंता स्वप्निल पाटील, अभियंता मोहिते, डॉ.बापुराव पवार, इकबाल शाह, जमील खाटीक, अनिस शाह, आसिफ शाह तसेच शहरातील उद्योजक व अधिकारी उपस्थित होते.

महिन्यातून एकदा दहा रुपयात दहा मिनिटे वकिलाशी साधा संवाद

कैद्यांसाठी नाशिकरोडच्या जेलमध्ये सुविधा

नाशिक । प्रतिनिधी

कारागृहात आपल्या कोर्टात चालू असणाऱ्या केस विषयी कैद्यांना बऱ्याचदा कायदेशीर मदत लागते. यासाठी अनेक वेळा वकील बांधवांशी संवाद होत नाही. नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार आता कैद्यांना जेलमधून दहा रुपयात दहा मिनिटे आपल्या वकिलांशी केस संदर्भात संवाद साधता येणार आहे. कैद्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करून ही योजना कारागृह विभागाने अमलात आणली असल्याचे कारागृह विभागाच्या अधीक्षिका अरुणा मुगुटराव यांनी सांगितले आहे.

जेलमध्ये असणाऱ्या काही कैद्यावर मानसिक दबाव असतो. शिक्षेमुळे कौटुंबिक सामाजिक, वैयक्तिक अशा अनंत अडचणींचा सामनाही करावा लागतो. कायदेशीर मार्गदर्शनही अनेक वेळा मिळत नाही आपल्या केसचे सध्याचे स्टेटस काय आहे? याचीही कल्पना कधी-कधी नसते म्हणून कायदेशीर मार्गदर्शनासाठी महाराष्ट्राच्या कारागृह विभागाने जेलमधून कैद्यांना महिन्यातून एकदा दहा रुपयात दहा मिनिटे वकिलांशी संवाद साधण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी कारागृहात सहा कॉईन बॉक्स आहेत. या कॉइन बॉक्स मधून एक रुपयात एक मिनिट असा कैदी संवाद साधू शकतो. एक कैदी महिन्यातील दहा मिनिटे कशीही वापरू शकतो. एक मिनिट बोलण्याचे मूल्य एक रुपये यासाठी मोजावे लागणार आहे. यामुळे कैदी बांधवांमध्ये मानसिक समाधान आहे. या आधी नातेवाईकांशी महिन्यातून दोन वेळा फोनवर संवाद साधण्याची सुविधा पूर्वीपासूनच नियमानुसार जेलमधून उपलब्ध करण्यात आलेली आहे. वकिलांशी संवाद साधण्याच्या या योजनेमुळे कैदी बांधवांमध्ये आनंद निर्माण झाला आहे. येरवडा कारागृहामध्ये वकिलांशी बोलण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची सुविधा सध्या उपलब्ध असून नाशिकरोड कारागृहात ही सुविधा भविष्यात येऊ शकते असे कारागृह अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

कैद्यांच्या मानसिक आरोग्य व कायदेशीर मार्गदर्शनासाठी ही सुविधा चांगली आहे. आपल्या केस संदर्भात कैदी वकिलांशी सल्लामसलत करून महिन्यातून दहा मिनिटे बोलू शकतात. - अरुणा मुगुटराव, अधीक्षिका, मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड.

आषाढी यात्रेनिमित्त विठ्ठलमंदीर परिसरात उभारले विविध पाळणे

धुळे । प्रतिनिधी

येत्या २९ जून रोजी धुळे शहरातील विठ्ठलमंदीर परिसरात आषाढी एकादशीनिमित्त यात्रा भरणार आहे, या पार्श्वभूमीवर मंदीर परिसरात विविध प्रकारचे पाळणे उभारण्यात आले आहेत.

आषाढी एकादशीच्या दिवशी धुळे शहरातील स्टेशन रोडवरील दसेरा मैदान चौकाजवळील विठ्ठल मंदीरात मोठी यात्रा भरत असते. जे भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर जावू शकत नाहीत किंवा प्रचंड गर्दीमुळे ज्यांना जाणे शक्य नसते. ते विठ्ठलभक्त धुळे शहरातील या विठ्ठलमंदीरात आषाढी एकादशीला यात्रेसाठी मोठ्या सख्येने दर्शनासाठी येत असतात.

यात लहान मुलांसह महिला, पुरुष, तरुण, तरुणी तसेच ज्येष्ठ नागरिकांचीही मोठी गर्दी असते. यात्रा म्हटली मंदीर परिसरात पाळणे उभारले जातात. या पाळण्यांचे लहानांसह मोठ्यांनाही आकर्षण असते. पाळण्यांवर बसून यात्रेचा आनंद लुटण्याची मजा काही औरच असते.

यात्रेला येणार्या भाविकांची ही अपेक्षा लक्षात घेवून विठ्ठल मंदीर परिसरात विविध प्रकारचे लहान मोठे आकर्षक पाळणे उभारण्यात आले आहेत. त्यामुळे मंदीर परिसराची शोभा वाढली आहे. ब्रेकडांस, नाव, ट्रेन, करास, सलंबो, बौंसी, चक्री, जम्पिंग असे विविध प्रकारचे पाळणे उभारले आहेत. हे पाळणे आषाढीला दि.२९ जून रोजी सकाळपासून रात्रीपर्यंत नागरिकांसाठी वाजवी दर आकारणीसह उपलब्ध असतील अशी माहिती पाळणे व्यावसायिक शरद वेंदे यांनी दिली. तसेच भाविकांनी आषाढी एकादशीच्या दिवशी मोठ्या संख्येने येवून विठ्ठलदर्शनासह पाळण्यांवर बसून यात्रेचा आनंद लुटावा असे आवाहनही वेंदे यांनी केले आहे.

पिंपळनेर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

पिंपळनेर । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. एसपी संजय बारकुंड यांनी दुचाकी चोरट्यांना तात्काळ वेसण घालण्याचे फर्मान जारी केले आहे. त्यानुसार पिंपळनेर पोलिसांनी धडक शोध मोहिम राबवून दुचाकी चोरांच्या टोळीचा पर्दाफाश केला. तसेच चोरट्यांकडून २० दुचाकी हस्तगत केल्यात. या कौतुकास्पद कामगिरीबद्दल पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी श्रीकृष्ण पारधी यांचेसह त्यांच्या टीमचे खुद्द एसपींनी कौतुक केले आहे.

पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोकॉ. राकेश बोरसे यांना मोटारसायकल चोरी करणार्या टोळीबद्दल गोपनीय माहिती मिळाली होती. त्याबाबत त्यांनी वरिष्ठांना माहिती दिली. त्याची पुष्टी करुन सपोनि श्रीकृष्ण पारधी यांनी एक खास पथक तयार केले. त्या पथकाने साक्री तालुक्यातील शेंदवड येथे रहाणारा शामील पांडू बागुल (२१) या तरुणास ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यास इंगा दाखवताच त्याने रोशन सुरेश गायकवाड (२३), रा. विरगांव, ता. बागलाण, जि. नाशिक याच्यासोबत साक्री तालुका आणि नाशिक जिल्ह्यातून मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी दोघांकडून २० दुचाकी हस्तगत केल्या आहेत. मिळालेला ऐवज ६ लाख २५ हजार इतका असून त्यांच्याकडून आणखी मोटारसायकली रिकव्हर होण्याची शक्यता आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, मा. अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी श्रीकृष्ण पारधी, पोसई भाईदास मालचे, असई लक्ष्मण गवळी, पोहेकॉ कांतिलाल अहिरे, पोहेकॉ प्रकाश सोनवणे, पोना अतुल पाटील, भास्कर सूर्यवंशी, पोकॉ राकेश बोरसे, प्रणय सोनवणे, पंकज माळी, विजयकुमार पाटील, रविंद्र सूर्यवंशी, पंकज वाघ, दावल सैंदाणे, नरेंद्र परदेशी यांचा समावेश आहे.

भरीव कामगिरी करणार्या पथकास प्रशस्तीपत्र!

तब्बल २० दुचाकी रिकव्हर करुन एका झटक्यात अनेक गुन्ह्यांची उकल करण्याची किमया पिंपळनेर पोलिसांनी साधली आहे. त्यांच्या या कामगिरीचे कौतुक वरिष्ठ पोलीस अधिकार्यांनी केले. तसेच पथकाच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना एसपी संजय बारकुंड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले. तर गुन्हा उघडकीस आणण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावणार्या पो.कॉ.राकेश बोरसे यांना दहा हजारांचा रिवार्ड एसपींनी घोषित केला.

आरोग्य धोक्यात : मिल परिसरातील सार्वजनिक शौचालयांची दुरावस्था

धुळे शहरातील सार्वजनिक स्वच्छता गृहांची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिकांना उघड्यावर शौचाला जाण्याची वेळ आली आहे. यामुळे महिला व मुलींची गैरसोय होत असून पालिकेने तातडीने लक्ष देऊन स्वच्छाता गृहांची दुरुस्ती व साफसफाई करण्याची मागणी येथील नागरिक करीत आहेत.

शहरातील १७ अंतर्गत येणाऱ्या मिल परिसरातील केंब्रिज इंग्लिश स्कूल जवळील स्वच्छता गृहांच्या स्वच्छतेकडे पालिकेकडून दुर्लक्ष होत असल्याने सध्या या शौचालयांची स्थिती अत्यंत खराब झाली आहे. पाण्याची व्यवस्था नसल्याने दुर्गंधी सुटली असून शौचालयाचा वापर करणे कठीण झाल्याने अनेक नागरिक उघड्यावर शौचाला जात आहेत. दरवाजे तुटलेले असल्याने मुली व महिलांची गैरसोय होत आहे. ''नका जाऊ उघड्यावर शौचाला'', ''संधी मिळेल रोगराईला'', अशा आशयाची रंगरंगोटी करणाऱ्या पालिकेने केली. मात्र, आहे ते शौचालयाचे दुरावस्थेमुळे अनेक शटर बंद करण्याची वेळ आली आहे. स्वच्छ भारत अभियानात भाग घेणाऱ्या मनपाने हजारो रुपये खर्चून रंगरंगोटी करून काय साधले. हाच प्रश्न नागरिकांना पडत आहे. कोट्यवधी रुपये खर्चून शौचालय बांधल्या. पण स्थानिक पालिकेची देखभाल नसल्याने अनेक शौचालयात घाणीचे साम्राज्य आणि पाणी नसल्याची समस्या आहे. तर लाइट रात्रीच्यावेळी बंद असते. शहराला एक विकसीत शहर म्हणून ओळखले जाते. मात्र, या शहरातील स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेने नागरिक त्रस्त झाले आहेत. नागरिकांनी अनेक वेळा हा प्रश्न मनपा प्रशासनाकडे मांडला होता. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. स्वच्छतागृह बांधताना त्याच्या नियमितपणे योग्य सफाई होण्याची व्यवस्था संबंधित संस्थांनी करणे त्यांच्यावर बंधनकारक असावयास हवे. आपल्याकडे बांधकामासाठी पैसा उपलब्ध होतो मात्र व्यवस्थापनासाठी कर्मचारी नेमणुकीवेळी अक्षम्य दुर्लक्ष केले जाते. परिणामी ही स्वच्छतागृहे अस्वच्छतेची केंद्रे बनतात.

भाग १

शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

पाण्याचे नियोजन नाही

रेल्वे स्टेशन सुरतवाला बिल्डिंग परिसरातील केंब्रिज इंग्लिश स्कूल जवळ अवघ्या काही महिन्यांपूर्वी शौचालय बांधकाम करण्यात आले होते. त्या ठिकाणी काही दिवस पाण्याचे व्यवस्थापन ही करण्यात आल यामुळे नागरिकांनी याचा वापर केला. व्यवस्थापन आणि मनपाचे निष्क्रिय व्यवस्थापन करणारा निरीक्षक याच्या हलगर्जीपणामुळे आजच्या परिस्थितीत अनेक शौचालयात दुर्गंधी पसरली असून पाण्याचे नियोजन नाही. त्यामुळे पाण्याच्या टाक्या रिकाम्या अवस्थेत आहेत.

लहान मुलाचे आरोग्य धोक्यात

मागील वर्षभरापासून या स्वच्छता गृहांच्या स्वच्छतेकडे पालिकेकडून दुर्लक्ष होत असल्याने सध्या या शौचालयांची स्थिती अत्यंत खराब झाली आहे. पाण्याची व्यवस्था नसल्याने दुर्गंधी सुटली असून शौचालयाचा वापर करणे कठीण झाले आहे. केंब्रिज इंग्लिश स्कूल देखील आहे. या याठिकाणी शिकणाऱ्या मुलाचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नाशकात पावसाचे आगमन; उकाड्यापासून दिलासा

नाशिक । प्रतिनिधी

जून महिना संपत आला तरी पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली नव्हती. त्यामुळे जिल्हावासीयांच्या नजरा पावसाकडे लागल्या होत्या. तसेच गेल्या दोन-तीन दिवसांपासून शहरासह जिल्हाभरात ढगाळ वातावरण असल्याचे पाहायला मिळत होते. मात्र, मुसळधार पाऊस बरसलेला नव्हता. परंतु, काल रात्रीपासून शहरासह ग्रामीण भागांत पाऊस कोसळत असल्याने शेतकरी सुखावला आहे.

नाशिक शहरातील विविध भागांत काल (दि.२५) रात्रीपासून पाऊस कोसळत आहे. त्यामुळे शहरवासियांना दिलासा मिळाला आहे. तसेच शहरात ढगाळ वातावरण असल्याचे पाहायला मिळत असून जिल्ह्यातील काही तालुक्यांत पाऊस बरसत आहे. तर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणाने तळ गाठायला सुरुवात केल्याने नाशिककरांना पाणी कपातीच्या संकटाला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, एकीकडे जिल्ह्यात पावसाचे आगमन झाल्यानंतर सुखद चित्र पाहायला मिळत आहे. दुसरीकडे शहरासह ग्रामीण भागातील काही ठिकाणी पाऊस पडला आहे. सध्या पावसाचा लपवाछपवीचा खेळ सुरु असल्याचे दिसत आहे.

मैत्री आणि व्यापार

संरक्षण व तंत्रज्ञान या क्षेत्रांत अमेरिकेची ताकद मोठी आहे; पण या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ भारतात आहे. मोदी यांचा ताजा दौरा व्यापारी स्वरूपाचा जास्त असला तरी भारतासाठी फायद्याचा आहे.

नायगरा धबधब्यावर भारताच्या ध्वजासारखा तिरंगी प्रकाश झोत, आंतरराष्ट्रीय योग दिन, अमेरिकन व भारतीय उद्योजकांशी चर्चा, अध्यक्ष जो बायडेन व त्यांच्या पत्नी जिल यांना दिलेल्या मौल्यवान भेटी, बायडेन यांनी आयोजित केलेला भोजन समारंभ; एकूण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ताजा अमेरिका दौरा उत्तम गाजला. भारत व अमेरिका हे दोन देश जुने मित्र आहेत. आजच्या जगात दोघांनाही या मैत्रीची गरज जास्त आहे. भारत व अमेरिकेशी चीनचे बिघडलेले संबंध, युक्रेनचे युद्ध यांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मोदी-बायडेन यांच्यातील चर्चेचे तपशील बाहेर येणे अवघड आहे; पण तीच चर्चा जास्त महत्त्वाची होती. दहशतवाद आणि हिंदी-प्रशांत महासागर क्षेत्रातील चीनची वाढती दादागिरी यांचा उल्लेख मोदी यांच्या भाषणात असणे अपरिहार्य होते. त्यांनी चीनचा नामोल्लेख केला नसला तरी जगाने अर्थ समजून घेतला. अमेरिका आणि भारत यांच्यात संरक्षण, तंत्रज्ञान, पर्यावरण, सर्वसाधारण व्यापार, शाश्वत ऊर्जा अशा अनेक क्षेत्रांत सहकार्याचे करार झाले. जनरल इलेक्ट्रिक आणि मायक्रॉन यांच्यासह अनेक अमेरिकन कंपन्यांबरोबर झालेले करार हेही या दौर्याचे वैशिष्ट्य होते. यामुळे आगामी पाच ते सात वर्षांत भारतात अमेरिकेची गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढण्याचा अंदाज आहे. त्याची देशास गरजही आहे.

वादग्रस्त मुद्दे टाळले

भारत व अमेरिका दोन्ही लोकशाही देश आहेत हा दोघांच्या मैत्रीमधील समान दुवा असला तरी काही मुद्द्यांवर त्यांच्यात मतैक्य नाही, हे अलीकडच्या काळातही दिसले आहे. भारतातील वाढती धार्मिक असहिष्णुता, वृत्तपत्र स्वातंत्र्य व राजकीय अवकाशाचा होणारा संकोच, अशा मुद्द्यांवर मोदी यांच्याशी थेट चर्चा करावी, अशी मागणी करणारे पत्र सिनेट व काँग्रेसच्या मिळून ७५ सदस्यांनी बायडेन यांना दिले होते. अमेरिकेत प्रसिद्ध झालेले या संदर्भातील अहवाल मोदी सरकारने वारंवार फेटाळलेही आहेत. असे वादग्रस्त मुद्दे बायडेन यांनी टाळले. युक्रेन युद्धात भारताच्या भूमिकेवर अमेरिकेत टीका झाली होती; पण संयुक्त निवेदनात रशियाचा मुद्दा आलेला नाही. वाजपेयी सरकारने अणुचाचणी घेतल्यानंतर अमेरिकेने भारतावर अणु व अवकाश तंत्रज्ञानाबाबत निर्बंध घातले होते. डॉ.मनमोहन सिंग यांनी अमेरिकेशी ऐतिहासिक स्वरूपाचा नागरी अणुसहकार्य करार केल्यानंतर हे निर्बंध कमी होऊ लागले. मोदी यांच्या ताज्या दौर्यात अवकाश संशोधन क्षेत्रात व्यापक सहकार्याचा करार झाला ही भारतासाठी उल्लेखनीय बाब आहे. आधुनिक लढाऊ विमाने बनवण्यासाठी शक्तीशाली इंजिनांची गरज असते. जनरल इलेक्ट्रिक या कंपनीने ही इंजिने भारतात तयार करण्याची व त्याचे तंत्रज्ञानही देण्याची तयारी दाखवली आहे. भारतीय हवाई दलाच्या आधुनिकीकरणास त्याचा उपयोग होईल असे वाटते. सेमीकंडक्टरचे उत्पादन भारतात होऊ लागल्यास त्याचा फायदा भारत व अमेरिका दोघांनाही होणार आहे. भारतात सर्वात जास्त आयात सध्या चीनकडून होत असली तरी अमेरिका हा भारताचा मोठा व्यापारी भागीदार आहे. भारतातून अमेरिकेस निर्यात जास्त होते त्या तुलनेत आयात कमी होते. हा असमतोल दूर करण्यासाठी अमेरिकन तंत्रज्ञान भारत घेणार असावा. चीन ही अमेरिका व भारतासाठी मोठी डोकेदुखी आहे. त्याला शह देण्यासाठी आशिया व हिंदी-प्रशांत महासागर क्षेत्रात अमेरिकेस भारतासारख्या देशाची गरज आहे. त्यामुळे भारताशी संरक्षणाच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे बायडेन यांनी ठरवलेले दिसते. आंतरराष्ट्रीय राजकारण 'देव-घेव' तत्त्वावर आधारित असते. भारताने अमेरिकेतून बर्याच गोष्टी घ्याव्यात यासाठी तो देश व्हिसाचे नियम शिथिल करणार आहे. भारतही निवडक अमेरिकन उत्पादनांवरील कर कमी किंवा रद्द करणार आहे. दोन्ही देशांपुढे आर्थिक व सामाजिक समस्या आहेत. मोदी व बायडेन यांना पुढील वर्षी निवडणुकीस सामोरे जायचे आहे. त्यामुळे लोकशाही देशांच्या मैत्रीचा समारंभ दोन्ही नेत्यांसाठी आवश्यक होता. अमेरिका मोठा विक्रेता आहे, तर भारत हा मोठा खरेदीदार आहे; पण आर्थिक विकासासाठी दोघांनाही या मैत्रीचा उपयोग होऊ शकतो हेही खरे.

पंढरीतील आषाढी वारी एक राष्ट्रीय मेळा

'वारी' हे एक आनंदनिधान आहे. व्यक्तिगत आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवरील बदलांच्या क्षमता 'वारी'मध्ये आहेत. सुमारे एक हजार वर्षे जुनी असणारी 'वारी' ज्ञानोबा-तुकाराम या विचार-परंपरेने बळकट केली. 'वारी'च्या माध्यमातून समाजकल्याणाची वहिवाट घालून दिली. या विचार-परंपरेचा कालसुसंगत अर्थ कळला, तर आपला प्रवास अधिक सुखाचा होईल, यात शंका नाही.

एखादा धर्मसंप्रदाय केवळ उपासनेपुरता, पूजा पद्धतीपुरता मर्यादित न राहता तत्त्व आणि विचारांसह सर्वसामान्य माणसांमध्ये झिरपतो आणि समाजाच्या वागण्या-बोलण्यातून दिसू लागतो तेव्हा त्याला परिपूर्णत: येते. महाराष्ट्र आणि वारकरी संप्रदाय यांचा संबंध हा असाच आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही जात-धर्म-पंथाच्या व्यक्तीला वारकरी संप्रदायाविषयी आस्था नसणे शक्यच नाही. देव न मानणारेदेखील 'वारी' आणि वारकरी संप्रदायाचे योगदान नाकारू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. या सर्वांसाठी दर वर्षी मोठ्या भक्तिभावाने संपन्न होणारी 'वारी' आणि आषाढी एकादशीचा भक्तिमय सोहळा हा अनुभवण्याबरोबरच अभ्यासण्याजोगी बाब आहे. केवळ राज्य वा देशातीलच नव्हे, तर परदेशातील लोकही वारीविषयी जाणून घेण्यास, त्यात सहभागी होण्यास आणि या भक्तिरसाचा एक भाग होण्यास आता उत्सुक असतात. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या काळापासून आजपर्यंत महाराष्ट्रात महानुभाव, जैन, शाक्त इत्यादी पंथ आणि परंपरेचे लोक होते आणि आहेत. पण या सर्वांच्या तुलनेने मराठी जनमानसात वारकरी संतांचा विचार जास्त मुरला. महानुभावाच्या विचारांना काठिण्य आहे. असे असते तिथे बोजडपणा आला. वीरशैवांचा विचार महाराष्ट्र काबीज करू शकला नाही. असे असताना वारकरी परंपरेला इतका पाठिंबा का मिळाला, याचा विचार केला असता वारकरी संतांचे सर्वसमावेशक तत्त्वज्ञान आणि या तत्त्वज्ञानाला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणारी विचार वितरण व्यवस्था हे दोन्ही भक्कम असल्याने वारकरी संप्रदायाला इतका लोकपाठिंबा मिळाला असावा, असे म्हणता येते.

सर्वच वारकरी संतांनी कुळ जात अप्रमाण मानले. शाव, नाथ, आनंद, चैतन्य, प्रकाश इत्यादी पंथांच्या विचारधारा वारकरी तत्त्वज्ञानात बेमालुमपणे मिसळून एकरूप झाल्या. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' असा वारकरी संतांचा व्यापक विचार होता. या सर्वसमावेशक विचारातच वारकरी संप्रदायाच्या यशाची बीजे आहेत. पण निव्वळ विचार चांगला असून जमत नाही तर तो लोकांपर्यंत व्यवस्थित पोहोचायला हवा, तसेच त्यातूनही त्या विचारांचे अनुयायी निर्माण व्हायला हवेत. विचार चांगला असला मात्र त्याला व्यापक लोकसंग्रहाची जोड नसेल तर अल्पायुषी ठरतो. कधी कधी आपण दुबळा विचार असणाऱ्या चळवळीही व्यापक लोकपाठिंब्यामुळे तग धरून राहिलेल्या पाहतो. म्हणजेच विचार महत्त्वाचा तितकाच तो कोणत्या पद्धतीने समाजापर्यंत पोहोचतो, तेही महत्त्वाचे आहे.

या पार्श्वभूमीवर समाजातील सर्व स्तरांपर्यंत वारकरी विचार पोहोचावा यासाठी संतांनी दोन पद्धती वापरल्या. पहिली पद्धत म्हणजे त्यांनी स्वत: विकसित केलेली जनसंवादाची माध्यमे. यामध्ये भजन, कीर्तन, भारूड, प्रवचन इत्यादींचा समावेश होता. दुसरी पद्धत म्हणजे पंढरीची वारी. या दोन प्रभावी साधनांच्या प्रभावी वापरामुळे वारकरी विचार उत्तम पद्धतीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. आजही महाराष्ट्रावर भजन, कीर्तनांचा पगडा आहे. कोणत्याही गावात आजही व्याख्यांनापेक्षा कीर्तन-प्रवचनाला जास्त गर्दी होते. नारदीय कीर्तन परंपरा पेठांमधील मठामंदिरात अडकून पडली पण वारकरी सांप्रदायिक कीर्तनांचे महाराष्ट्रावर 'गारूड' आहे हे खरे. यासोबतच पंढरीची पायी वारीदेखील हे विचार पोहोचवण्याचे महत्त्वाचे साधन आहे. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी होणारे सैन्याचे संचलन किंवा स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील प्रभात फेऱ्या यांच्या माध्यमातून आपल्या संघटनेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न असतो. अशाच प्रकारे वारीच्या माध्यमातून वारकरी विचार, तत्त्वज्ञान सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला. म्हणूनच पंढरीची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात जुनी, सर्वात मोठी, सर्वात जास्त दिवस चालणारी विचार यात्रा आहे.

वारी हा वारकऱ्यांचा कूळ धर्म आहे. महाराष्ट्राची महाउपासना आहे. तिला विवेकाचे अधिष्ठान आहे. विवेकाचा गाभा हरवला की कोणत्याही उपासनेमागील विचाराचा आत्मा मरून जातो आणि निव्वळ कर्मकांड शिल्लक राहते. माणूसपणाच्या मर्यादांसह गाथा ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान जगू पाहणाऱ्या लोकांचा मेळावा म्हणजे वारी. वारी ही एक धार्मिक कृती असली तरी त्यामध्ये कोणतीही बुवाबाजी, गुरुबाजी, भपकेबाजी यांचे स्तोम नाही. कोणी तसा प्रयत्न केला तर शहाणे वारकरी अलगद बाजूला काढतात. वारीत आणि वारकरी संप्रदायात कोणालाही धर्माच्या नावाने शोषण करण्याची संधीच नाही, कारण संतांनी तशी मेखच मारून ठेवली आहे. गाथा ज्ञानेश्वरीच्या चौकटीत कोणत्याही वारकरी कीर्तनकार, फडकरी, गुरूच्या वर्तनाची चौकशी करण्याचा अधिकार सामान्यातील सामान्य वारकऱ्याला आहे. वारकरी संप्रदायात नेतृत्व करणाऱ्यावर संतविचारांचा असा सकारात्मक दबाव आहे. कोणत्याही साध्या माणसाने विचारप्रवृत्त होण्यासाठी भरपूर प्रवास केला पाहिजे तसेच विद्वानांशी मैत्री केली पाहिजे असे सुभाषितकारांनी सांगितले आहे. पंढरीच्या वारीच्या वाटेवर संतसज्जनांची संगत मिळते आणि भजन, कीर्तनाच्या माध्यमातून संतविचार अंत:करणात पाझरतो. संतांचा विचार आणि त्या विचाराने प्रभावित होऊन कृती करणारे वारकरी वारीच्या वाटेवर भेटतात. विचार आणि कृती यांचे एकमेकांसोबत हातात हात घालून चालणे दिसते. अखंड १८ दिवस अभंगांच्या सान्निध्यात राहिल्यानंतर अभंगांचेच गायन, श्रवण, चिंतन केल्यानंतर माणसाच्या बदलाची प्रक्रिया निश्चितच सुरू होत असेल. कोणत्याही विचाराने वारीत या, वारीचा आत्मा कळाला की, पंढरपूरला गेल्यावर 'तुझा विसर न व्हावा' हेच मागणे शिल्लक राहाते. वारीमागचा हा विचार समजला नाही, तर आपण वारकरी होण्याऐवजी फक्त 'बघे' होतो. महाराष्ट्र संस्कृती, मराठी माणूस आणि मराठी भाषा यासंबधी गांभीर्याने विचार करणाऱ्या कोणालाही वारीकडे डोळेझाक करता आलेली नाही. महाराष्ट्र उभा राहण्यात आणि भविष्यात योग्य दिशेने चालण्यासाठी वारीचे योगदान महत्त्वपूर्ण असणार आहे. जगभरातील सर्व समाजात समता प्रस्थापित करणे हे एकविसाव्या शतकातील सर्वात मोठे आव्हान असल्याचे जगप्रसिद्ध लेखक युनान हरारी यांनी आपल्या नव्या पुस्तकात नोंदवले आहे. ज्ञानोबा-तुकाराम हे संत महाराष्ट्रातील समतेच्या लढाईचे पहिल्या फळीचे शिलेदार होते. त्यांचे विचारसंचित घेऊन समाजसुधारकांनी ही समतेची लढाई पुढे नेली. ती पुढे जाण्यासाठी या 'समता संगराला वारीचे सामर्थ्य लाभावे' ही अपेक्षा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी व्यक्त करून ठेवली आहे. धर्माची विवेकी चिकित्सा करणारे, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ महाराष्ट्रात रुजवणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर वारीची क्षमता ओळखून होते. वारकरी विचारांचा पाया क्रांतिकारी असून त्याच्या तत्त्वज्ञानाची मांडणी जातीअंताच्या दिशेने जाणारी आहे. आचार, विचार आणि उच्चार यातील शुद्धता, पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा याचे प्रतीक म्हणून डॉ. दाभोलकर वारकऱ्यांकडे पाहतात आणि वारकऱ्यांकडून सामाजिक मन्वंतर घडवून आणण्याची रास्त अपेक्षाही करतात.

वारी, वारकरी संप्रदाय यांचे महत्त्व ओळखून असणारे राजारामशास्त्री भागवत हे आणखी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व. वारकरी संप्रदाय हा मराठी संस्कृतीचा मुख्य प्रवाह असून गाथा, ज्ञानेश्वरी हे मराठ्यांचे आगम आणि आळंदी, देहू, पंढरपूर ही त्रिस्थळी असल्याचे शास्त्रीजींनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वी सांगितले आहे. १८९४ मध्ये लोकमान्य टिळकांनी राष्ट्रजागृतीच्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. या पार्श्वभूमीवर राजारामशास्त्रींनी 'ज्ञानोबाची पालखी' या शीर्षकाचा लेख लिहिला. पंढरीच्या वारीसारखा जुना राष्ट्रीय मेळा जागता असताना सार्वजनिक गणेशोत्सवासारख्या नव्या राष्ट्रीय मेळ्याची आवश्यकता नाही, असे सांगत शास्त्रीजींनी पंढरीच्या वारीच्या राष्ट्रजागृतीच्या क्षमता स्पष्ट केल्या आहेत. वारकरी नसणाऱ्या पण वारीचे महत्त्व ओळखणाऱ्या राजारामशास्त्री आणि डॉ. दाभोलकर यांच्या साक्षी या आनुषंगाने पुरेशा आहेत. थोडक्यात, व्यक्तिगत आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवरील बदलांच्या क्षमता वारीमध्ये आहेत. सुमारे एक हजार वर्षे जुनी असणारी वारी ज्ञानोबा-तुकाराम या विचार-परंपरेने बळकट केली. वारीच्या माध्यमातून तिने समाजकल्याणाची वहिवाट घालून दिली. आज या विचार-परंपरेचा कालसुसंगत अर्थ कळला, तर आपला प्रवास अधिक सुखाचा होईल, यात शंका नाही.

-सचिन पवार : अभ्यासक
(लेखक वारकरी कीर्तनकार आहेत.)

जगाचा पोशिंदा पावसाच्या प्रतीक्षेत

एकीकडे अरबी समुद्रामध्ये निर्माण झालेले 'बिपरजॉय' चक्रीवादळाच्या बातम्यांमुळे समुद्रकाठावरील नागरिकांना हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिलेला आहे. तेव्हा समुद्रकाठच्या जनतेने काळजी घेणे गरजेचे आहे. असे असले तरी यावेळी पावसाचे आगमन होण्यापूर्वी वादळी वाऱ्यामुळे धुळीने सर्वांना माखून टाकले. इतकेच नव्हे तर घरामध्ये सुद्धा धुळीने अंथरून घातले. त्यामुळे प्रत्येकाला आपल्या घराची सफाई करावी लागली. ११ जून रोजी रिमझिमत्या पावलाने पावसाचे आगमन झाले. मात्र आपण येत आहोत, याची चाचपणी करून गेला. यात कोकणात काही ठिकाणी पावसाच्या विश्वासावर शेतकऱ्यांनी पेरणी केली. आता जून महिना अजून एका आठवड्याने संपेल. तरी पावसाचा पत्ताच नाही. त्यामुळे शेतकरी राजा चिंतेत आहे. यात काही ठिकाणी दुबारा पेरणी करण्याची वेळ शेतकरी राजावर आली आहे.

आता पाऊस लवकरच येईल, असे वातावरण दिसत असले तरी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कुडाळसारख्या तालुक्यात काही गावांना टॅन्करने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली. मग सांगा इतर गावांचे काय झाले असेल. आता असे काही रूप पाऊस धारण करेल की, आपल्याला घरातून बाहेर पडू देणार नाही. शेवटी निसर्गाच्या पुढे कोणाचेही चालत नाही हे सत्य आहे. त्यामुळे सध्या चातक पक्षाप्रमाणे 'पावसा गो' करण्याची वेळ शेतकरी राजावर आली आहे. काही शेतकरी तर आकाशाकडे डोळे लावून आहेत. त्यात मिरगसुद्धा सुखा गेला. तेव्हा कधी एकदा पाऊस पडतो आणि भात पेरतो असे शेतकरी राजाला झाले आहे. म्हणजे शेतकरी राजाची सुगीची कामे सुरू होतील.

कोकणात काही ठिकाणी रिमझिमत्या आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी पावसाच्या विश्वासावर भात पेरणी केली, तर काही शेतकरी मुसळधार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. जमीन ओली झाल्यावर नांगरणी करणे सुलभ होईल. नदी-नाल्यांना पाणी सुटेल आणि पुढील शेतीची कामे सुरू करता येतील. काही शेतकरी दादा आपल्या जवळ असलेल्या अनुभवाच्या जोरावर पेरणी करतात. त्यात बऱ्याच वेळा यशस्वी होतात. अलीकडच्या काळात काही वेळा हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला नव्हता. त्यामुळे शेतकरी दादाला काही प्रमाणात धोका सहन करावा लागला होता. शेवटी ही नैसर्गिक आपत्ती आहे. आता उशिरा का होईना पावसाचे आगमन होईल, अशी आशा व्यक्त करूया.

मागील एक महिना शेतकरी राजा आकाशाकडे अधून मधून नजर लावून होता. मात्र कडक उन्हामुळे त्याला पावसाचा अंदाज घेता येत नव्हता. आता संध्याकाळची गार हवा आणि त्यात अधूनमधून पडणारा काहीसा रिमझिम पावसामुळे शेतकरी राजा आनंदित वाटत असला तरी त्यांचा पावसावर विश्वास बसत नव्हता. त्यामुळे अधिक चिंतेत दिसत होता. शेतकरी राजा आपला पारंपरिक व्यवसाय व उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन 'शेती' असल्यामुळे शेतीकडे लक्ष देत आहे. सध्याच्या परिस्थितीत बैल जोडी परवडत नाही. म्हणून मोठे शेतकरी स्वत: ट्रॅक्टर घेतात किंवा भाड्याने ट्रॅक्टर घेऊन शेत जमिनीची नांगरणी करतात. ज्या शेतकऱ्याची बैलजोडी आहे तो नांगराच्या सहाय्याने नांगरणी करू शकतो. मात्र त्यासाठी जमीन भिजण्याइतका किमान पाऊस पडणे गरजेचे असते. ट्रॅक्टरच्या सहाय्याने सुखी जमीन सुद्धा नांगरू शकतो. **-क्रमश:**

-रवींद्र तांबे

शब्दकोडे-१०४

आडवे शब्द

१. कोकणाला तडाखा देऊन गेलेले चक्रीवादळ ४. दुसऱ्यासाठी केलेला खर्च ८. यजमान १०. अतर्क्य गोष्ट घडणे ११. जादू १३. संरक्षणकर्ता १४. वाईट इच्छा १५. मुंबईचा घरगडी १६. पवन १७. अरण्य, जंगल १८. शरीर २०. गाय २१. युवती २२. टीका, समीक्षा करणारा २५. रत्न २७. मनात साठवलेल्या अभद्र गोष्टी (ला.) २८. एक मिश्र धातू ३०. प्रतिष्ठित ३२. पायाला भेगा पडण्याचा रोग ३४. चिंतन ३६. वाणी, बोलणे ३८. मूळ आधार ३९. घटस्फोट ४०. निमग्न, गुंग ४२. ललाट ४३. जन्म-मृत्यू ४५. खूपच छान! ४७. शहर ४८. बारा वर्षांचा काळ ५०. टिकून रहाणे ५१. स्तुती करण्याजोगे ५३. आरोप ५४. पूजेचे ताट ५६. चित्रपट-नाटक इ.ची गोष्ट ५८. समूळ नाश ५९. मंत्रिमंडळ ६२. मेहेरबानी ६३. अंड्यातील पिवळा भाग ६५. भाजी चिरण्याचे साधन ६६. मोठे उथळ ताट ६७. धमकी ६९. गुंडी (इंग्रजी) ७०. धन्यवाद ७२. तात्काळ ७३अ. विश्व ७४. वस्ती ७४अ. तबस्सुमप्रमाणेच 'सदाहरित' अभिनेत्री --- जलाल ७५. रवाळ

उभे शब्द

१. खळबळजनक २. मागणारा ३. दारूचा एक प्रकार ४. अनुमती ५. सजावट करणारा ६. कोवळी फांदी ७. केर ८. तंतुवाद्य वाजवताना बोटात घालण्याचे तारेचे साधन ९. पत्त्यातील जोडपे ९अ. घरगुती पिठाची चक्की १२. तिबेटी धर्मगुरु १६. मुंग्याचे घर १९. वेदना २१. अंधार (संस्कृत) २३. अंजनाचा एक प्रकार २४. चांदी २६. नमन २७. एक सुगंधी वनस्पती २९. वडील ३१. सावली ३२. छातीतील दाह ३३. गाड्या उभ्या ठेवण्याची जागा ३४. असह्य वेदना ३५. मान खाली घातलेला ३७. हालचालीवर ठेवलेली नजर ३९. पुष्कळ ४१. पुत्र, मुलगा ४४. नंतर ४६. च्या साठी ४९. बिल्ला ५२. रूचीहीन ५३. आपला-परका असा भेद ५५. मोठे (डोळे), ओबडधोबड ५७. दृष्टीभेट ५८. भांडण लावणारा मुनी ६०. सुट्टीचा दिवस ६१. शेती म्हणजे शेतकऱ्यासठी – आई ६४. कीर्तनकार ६६. गुणाकार ६८. सहाय्य ६९. चिनीमातीचे उभट पात्र ७१. पृथ्वी ७२अ. शाहिराचे वाद्य ७३. हिंदीत साधा, सालस



शब्दकोडे १०३ चे उत्तर

आडवे उत्तर
१.पाकळी ३.अजरामर ६.कालवड १०.पर ११.सम १२.सर १३.आळस १४.रसना १५.परोपकारी १६.गरळ १८.लटका १९.पाट २०.कात २१.कळस २२.कास २४.मलम २५.रचना २६.आम २७.परका २९.तलाशी ३०.माणूसघाणा ३२.महाराज ३३.सार ३४.मी ३५.अवतार ३६.जन गण मन ४०.मका ४२.अचाट ४४.आड ४५.दगड ४६.होकार ४८.अनारकली ५०.धन ५१.कलकलाट ५४.तळ ५६.बाबत ५८.ध्यानमग्न ५९.खोकला ६१.मावळण ६२.कली ६३.जय जवान ६६.बोका ६७.मतदार ७०.जन ७२.मध्य ७३.महामानव ७५.बडबड ७६.जाम ७७.रविवार ७८.यमन

उभे उत्तर
१.पाप २.करपट ३.अमकातमका ४.रास ५.मरगळ ६.काळ ७.लसलस ८.डरकाळी ९.अनाथाश्रम ११.सपका १३.आळ १७.रसरशीत १९.पारा २१.कमतरता २२.कानामागून आली २३.अपराध २६.आणा २८.रज ३१.सहाण ३२.महामहोपाध्याय ३३.सावट ३४.व ३५.अचानक ३७.गड ३८.मदनबाण ३९.नग ४१.काका ४३.परत ४७.रकमपात ४८.अटक ४९.कळ ५२.लग्न ५३.लाखोली ५५.अवनत ५७.तडकाफडकी ६०.लाज ६१.मावा ६२.कर ६४.यजमान ६५.जनन ६७.मध्यम ६८.दादर ६९.समर ७१.नड ७२.मजा ७४.वय ७५.बन

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

भरधाव कारची दुचाकीला धडक, दोन ठार

नाशिक । त्र्यंबकेश्वररोडवरील हॉटेल संस्कृतीसमोर टायर फुटल्याने दुभाजक तोडून कारने दुचाकीवरील दोघांना धडक दिल्याने दोन युवक जागीच ठार झाले. अपघातग्रस्त कार त्र्यंबकहून नाशिककडे चालली होती तर दुचाकीस्वार नाशिकहून त्र्यंबककडे चालले होते. सोमवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास हा अपघात घडला. नामदेव विठ्ठल शीद (३६, रा. राजेवाडी) व सुनील मनोहर महाले (२६, रा. वाढोली) अशी अपघातात मृत झालेल्या युवकांची नावे असून हा अपघात सीसीटीव्हीतदेखील कैद झाला आहे. त्र्यंबकेश्वरहून नाशिककडे वेगाने येणाऱ्या एमएच २६ एके ३०६१ या होंडा सिटी कारचे टायर फुटल्याने कार थेट रस्ता दुभाजक तोडून विरुद्ध दिशेला आली. याचवेळी नाशिककडून त्र्यंबकेश्वरच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकी क्रमांक एमएच १५ एफजे ७४७७ व एमएच १५ डीएन ८२०१ दोन दुचाकींना तिने जोरदार धडक दिली.

क्रीडा शिक्षकांचा सत्कार करणे हे आमचे कर्तव्यच- ना.भुसे

शिवसेना उत्तर महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार २०२३ सोहळा उत्साहात

नाशिक । प्रतिनिधी

शिवसेना वर्धापदिनानिमित्त सुरू असलेल्या 'भगवा महिना' अंतर्गत शिवसेना नाशिक क्रीडा सेलच्या वतीने शिवसेना उत्तर महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार २०२३ सोहळा शुभमंगल कार्यालय, बळी मंदिर येथे संपन्न झाला. नाशिक विभागातील एकूण ५२ तालुक्यातील १०४ क्रिडा शिक्षकांचा क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ऑलिम्पियन, अर्जुन पुरस्कार विजेते सईद जलालूद्दिन रिझवी, पालकमंत्री दादाजी भुसे, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, शिवसेना क्रीडा सेल जिल्हाप्रमुख अशोक दुधारे, क्रीडा अधिकारी महेश पाटील, अशोक कदम, राजेंद्र शितोळे यांच्या हस्ते गौरव चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

एक खेळाडू घडवणे व त्यासाठी लागणारी मेहनत ही खूप मोठी असते, क्रीडा शिक्षक एकाच वेळेला अनेक खेळाडू घडवत असतात, त्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्यच आहे, असे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले. क्रीडा संदर्भात आपल्या सर्व मागण्या घेऊन आपले क्रीडा शिष्टमंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे घेऊन जाण्याचे आश्र्वासित केले. शालेय शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात महत्वाचे शिक्षण असते आणि शिकवणारे शिक्षक हेच त्याचे शिल्पकार असतात. विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने शिस्त लावण्याचे काम क्रीडा शिक्षकच करत असतात असे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी दीपक निकम, दीपक पाटील, अविनाश वाघ, शैलेश रकिबे, महेंद्र साळवे, उदय खरे, मनीषा काठे, ज्योती निकम, ऋषिकेश गुरव, नामदेव खांदवे यांचे विशेष सहकार्य लाभले. मान्यवरांचे स्वागत दीपक निकम यांनी, सूत्रसंचालन अविनाश वाघ, प्रास्ताविक अशोक दुधारे यांनी तर आभार प्रदर्शन दीपक पाटील यांनी केले.

मराठा महासंघातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन

नाशिक । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज मराठा मंगल कार्यालयात अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे नवनिर्वाचित युवक जिल्हाध्यक्ष व्यंकट मोरे आणि जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रभाकर दिंडे, चंद्रकांत बनकर, राजेंद्र शेळके, सोनवणे, अविनाश वाळुंजे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची माहिती यावेळी दिली.

यावेळी रमेश भोसले, संजय फडोळ, अस्मिता देशमाने, योगेश पाटील, रमेश खापरे, विजय सोनवणे, आरती गायखे, प्रमिला पाटील, ज्योती जाधव, संतोष पाटील, सागर बागुल, अमोल पवार, पल्लवी पिंगळे, शोभा काळे, पुंडलिक घुले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रभाकर दिंडे यांनी तर आभारप्रदर्शन अविनाश वाळुंजे यांनी केले.

हरित सेना करणार ठिकठिकाणी वृक्षारोपण

लासलगाव । येथे हरितसेनेच्या माध्यमातून वृक्षारोपणाची चळवळ उभी रहात असुन त्यात महिलांचा देखील सहभाग वाढतो आहे.हरितसेनेने लासलगावमध्ये वृक्षारोपणाचा आणि संगोपनाचा जो विडा उचलला आहे त्यासाठी आता महिला देखील पुढे येत आहे. कडुलिंबाची ३ कांचनार ची २ अशी एकूण ५ झाडे लावली असुन ती झाडे सांभाळण्याची त्यांचे संगोपन करण्याची त्यांनी जवाबदारी घेतली आहे.

अ.भा. युवक मराठा महासंघ नाशिकची कार्यकारिणी जाहीर

नाशिक । प्रतिनिधी

युवक मराठा महासंघ नाशिक शहर व जिल्हा कार्यकारिणी जय शिवराय उद्योग कार्यालय, कॉलेज रोड येथे नुकतीच जाहीर करण्यात आली. युवक प्रदेश अध्यक्ष रणजित जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश संपूर्ण प्रमुख व प्रचारक तुषार जगताप, फादर बॉडी महासंघ जिल्हा अध्यक्ष विलास जाधव, नीलेश मोरे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

त्यावेळी युवक जिल्हाध्यक्ष म्हणुन अप्पासाहेब गाडे, प्रविण गडाख यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच नाशिक शहर विधानसभा नुसार शहराध्यक्ष देण्यात आले. पूर्व विधानसभा शहराध्यक्ष विरेंद्र भुसार, मध्य विधानसभा शहराध्यक्ष अमित नडगे, पश्चिम विधानसभा शहराध्यक्ष राजेश कदम यांची निवड करण्यात आली. शहर उपाध्यक्ष गणेश राजपूत, पंचवटी अध्यक्ष कुणाल भवर, उप जिल्हाध्यक्ष अध्यक्ष दीपक डेरले निवड करण्यात आली. निवडीच्या वेळी प्रदेश संपर्क प्रमुख तुषार जगताप यांनी युवक महासंघ पुढील काळात तरुणांचे रोजगाराचे प्रश्न उठविलणार अणि उद्योग व सामाजिक या दोन विषयांवर जनजागृती करण्याचे उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. यावेळी सचिन पवार, सुरेश सोळखे, अंकुश पाटील, ऋषिकेश आथरे, बळी घडवजे, संजना पगार उपस्थित होते.

माळी समाजाचा जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा ६ ऑगस्टला

नाशिक । प्रतिनिधी

माळी समाज सेवा समितीची बैठक रविवारी रोजी सकाळी श्रद्धा लॉन्स गणेशवाडी येथे माळी समाज सेवा समितीचे अध्यक्ष विजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या बैठकीमध्ये सुरवातील माळी समाजाचे ज्येष्ठ नेते व हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष उत्तमराव (मामा) तांबे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

बैठकीत माळी समाज सेवा समितीच्या कार्यकारणीची फेररचना करण्याबरोबर नवीन युवकांना संधी देण्याबाबत चर्चा करण्यात आली असून लवकरच नवीन कार्यकारिणीची देखील घोषणा करण्यात येणार आहे. यासोबत माळी समाजाचा जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौ रव समारंभ रविवारी ६ ऑगस्ट आयोजित करण्याचे ठरविण्यात आले आहे. माळी समाजातील हुशारगुणी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी समितीच्या वतीने १ ली ते १२ वी, बी.कॉम, एम.कॉम, डी.एड, बी.एड, डिप्लोमा, इंजिनीरिंग, डॉक्टर, सीए अशा सर्व वर्षातील सर्व विभागातील ७५% पेक्षा जास्त मार्क असलेल्या व विविध राष्ट्रीय, राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचे ठरण्यात आले.

येत्या १ ऑगस्ट पर्यंत गुणपत्रकाची प्रत माळी समाज सेवा समितीचे कार्यालय ४६१०, जुना आडगाव नाका, पंचवटी, नाशिक या पत्यावर अथवा ९५७९३८५९०९ या व्हाट्सअप नंबरवर नाव, पत्ता, फोन नंबर, इयत्ता, शाळेचे नाव, गुण इत्यादी माहिती पीडीएफ स्वरुपात पाठवावी. अशी माहिती माळी समाज सेवा समितीचे अध्यक्ष विजय राऊत यांनी दिली.

बैठकीमध्ये प्रभाकर क्षीरसागर, मयूर मोटकरी, किशोर भास्कर, सचिन दप्तरे, महेश गायकवाड, शंतनू शिंदे, शरद मंडलिक, संदीप बच्छाव, अभिजीत राऊत, अभिषेक निकम यांनी विविध सूचना मांडल्या. या बैठकीला माळी समाज सेवा समितीचे कार्याध्यक्ष प्रभाकर क्षीरसागर, सरचिटणीस हरिश्चंद्र विधाते, मंगला माळी, मंगला जाधव, प्रवीण जेजुरकर, मयूर मोटकरी, महेश गायकवाड, शंतनू शिंदे, भास्कर जेजुरकर, दिलीप जुन्नरे, कैलास सैनी, संतोष मौर्य, राजेंद्र ताजने, रमेश गायकवाड, भाऊसाहेब पवार, संजय भडके, किशोर भास्कर, गणेश राखोंडे, बाळासाहेब वाघ, नंदकुमार येवलेकर, प्रवीण सुरसे, अशोक जाधव, संजय पुंड, देविदास खैरे, संदीप बच्छाव, विजया जाधव, प्रेमलता जुन्नरे, भारती शेलार, संजीवनी जाधव, जगदीश ताजने, मिलिंद तांबे, शरद मंडलिक, विलास वाघ, अभिजीत राऊत यांच्यसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन मयूर मोटकरी यांनी तर आभार अभिषेक निकम यांनी मानले.

प्रत्येक नागरीक केंद्र सरकारच्या योजनांचा लाभार्थी - साने

नाशिक । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्र सरकारला ९ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने मोदी९ कार्यक्रमांतर्गत पंचवटीतील अभिषेक प्लाझा येथे लाभार्थी संमेलन संपन्न झाले. यावेळी भाजपाचे नेते विजय साने यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधतांना उज्वला गॅस योजना, हर घर जल योजना, आयुष्यमान भारत योजना, प्रत्येक नागरीकाला करोना प्रतिबंधक लस, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, जनधन योजना, प्रधानमंत्री कौशल्य योजना, किसान क्रेडीट कार्ड, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री मुद्रा योजना, प्रधानमंत्री मातृवंदाना योजना आदी योजनांमध्ये देशातील प्रत्येक नागरीकाला लाभ मिळालेला असल्याचे साने यांनी सांगितले. तसेच सर्वच क्षेत्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असल्याचे आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले.

यावेळी आ.राहुल ढिकले यांनी मनोगतात केंद्र सरकारच्या योजना मतदार संघातील प्रत्येक नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी मी कटीबध्द असल्याचे सांगितले.

यावेळी व्यासपीठावर भाजपा शहराध्यक्ष गिरीश पालवे, संघटन सरचिटणीस प्रशांत जाधव, सुनिल केदार, जगन पाटील, माजी महापौर रंजना भानसी, माजी नगरसेवक गणेश गिते, अरुण पवार, युवा मोर्चा अध्यक्ष अमित घुगे, संतोष नेरे, सुनिता पिंगळे, पुंडलिक खोडे, सुरेश खेताडे, रुची कुंभारकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष गिरीश पालवे यांनी तर सुत्रसंचालन सुनिल केदार व आभारप्रदर्शन अमित घुगे यांनी केले.

एसएमआरके बीकेएके महिला महाविद्यालयाचा उद्या वर्धापनदिन

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमध्ये स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या गोखले शिक्षण संस्थेच्या एसएमआरके महिला महाविद्यालयाचा ३९ वा वर्धापनदिन दि. २८ रोजी महाविद्यालयाच्या पाटणकर सभागृहात होत आहे. संस्थेच्या एचआर डायरेक्टर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीप्ती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन होत आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी धुळ्याचे विख्यात सनदी लेखाकार व अध्यात्माचे व्यासंगी अभ्यासक व प्रभावी वक्ते प्रकाश पाठक उपस्थित रहाणार आहेत. तर अध्यक्षस्थानी शिक्षण तज्ज्ञ, संस्थेचे सचिव व महासंचालक डॉ. मो. स. गोसावी राहणार आहेत. याप्रसंगी महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'शतरूपा' व संशोधनपर निबंधांचा अंक 'इम्प्रेशन्स' गोखले शिक्षणसंस्थेच्या संशोधनपर नियतकालिक 'स्वयंप्रकाश' व वाणिज्य विभागाद्वारे आयोजित 'डिसरप्टेड ग्लोबल रिकव्हरी अँड इटस् इम्प्लिकेशनस् ऑन इंडियन इकॉनॉमी' या राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राच्या स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे.

नाशिकरोडला असंख्य तरुणांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकरोड परिसरातील असंख्य तरुणांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. पक्षाचे उपनेते सुनील बागूल आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शालिमार कार्यालयात या सर्वांचे स्वागत करून त्यांच्या हाती शिवबंधन बांधण्यात आले.

उद्धव ठाकरे यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच आहे. तरुण वर्गावर त्यांचा मोठा प्रभाव आहे आणि म्हणूनच मोठ्या प्रमाणात तरुण शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करीत आहेत, असे प्रतिपादन सुनील बागूल यांनी केले. प्रवेश करणाऱ्यांमध्ये शिवा गाडे यांच्या नेतृत्वाखालील नाशिकरोड परिसरातील असंख्य तरुणांचा समावेश आहे. व्यासपीठावर सह संपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख विजय करंजकर, महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, माजी आमदार वंसत गिते, माजी महापौर विनायक पांडे, माजी गटनेते विलास शिंदे, उपजिल्हाप्रमुख महेश बडवे, सचिन मराठे, भाविसे जिल्हा संघटक वैभव ठाकरे, विधानसभा प्रमुख बाळासाहेब कोकणे, शैलेश सूर्यवंशी, महानगर संघटक देवा जाधव, महानगर संघटक संचिन बांडे, समन्वयक नितीन चिडे, प्रशांत दिवे, माजी नगरसेवक मूशीर सैय्यद, भैय्या मणियार, युवासेना उपजिल्हाधिकारी बाळकृष्ण शिरसाठ यांच्यासह शिवसेना महानगर पदाधिकारी मसूद जिलानी, ऋषी वर्मा, नीलेश सांळूके, सुभाष शेजवळ, विरेंद्र टिळे, राजेंद्र नानकर, संतोष ठाकूर, हार्षद पटेल, संतोष फुले आदी होते.

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना हीच खरी शिवसेना आहे हे लोकांना पटू लागले असून आता या पक्षांकडे मोठ्या प्रमाणात लोक आकर्षित होत आहेत हे शुभ संकेतच म्हणावे लागेल, असे सह संपर्कप्रमुख दता गायकवाड यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

आगामी महापालिका निवडणुकीत या तरुण रक्तावर पक्षाची खरी भिस्त राहील आणि त्यांनी आतापासूनच सज्ज राहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख विजय करंजकर यांनी केले.

गद्दारांनी पक्ष सोडल्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे काय होणार? याबाबत व्यक्तव्य करणाऱ्यांना हा प्रवेश सोहळा म्हणजे एक प्रकारे चपराकच आहे. येत्या काही दिवसात विविध पक्षातील अनेक लोक ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत, असे सांगून महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी या सर्व तरुणांचा पक्षात आदर बाळगला जाईल,असे अभिवचन दिले. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हाती भगवाध्वज देऊन त्यांना पक्षात समावून घेण्यात आले.

प्रवेश करणाऱ्यांमध्ये आनंद पवार, गौरव नितनवरे, विकी सोनवणे, किरण पिठे, आकाश मोकळ, अनुराग शिंदे, चंदू शिंदे आदींचाही समावेश आहे. सूत्रसंचालन सचिन बांडे यांनी केले

प्रोसेस जमा **ॲड.अक्षय ए. सगर, साक्री**
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज क्र. १६१/२०२३

१. श्री. विवेक वसंत पिसोळकर, उ. व . - ५५, धंदा - खाजगी नोकरी, राहणार-प्रसाद बंगाला, तलाठी कॉलनी, साक्री, ता. साक्री, जि.धुळे
२. श्री.नंदकुमार वसंत पिसोळकर, उ. व. - ६२, धंदा-सेवानिवृत्त, राहणार प्लॉट नं.१६, स्वामी विवेकानंद सोसा., नकाणेरोड, देवपूर, धुळे, ता. जि. धुळे
३. नलिनी नारायण जोशी, उ.व. - ७२, धंदा - गृहिणी, राहणार-दिंडोरीरोड, पोखरण भवन, नाशिक, ता. जि. नाशिक,
४. सौ. रेखा उर्फ शिल्पा शाम कपोले, उ.व. - ६०, धंदा - गृहिणी, राहणार-प्लॉट नं. १००, विद्यानगरी, दत्तमंदिर, देवपुर, धुळे
५. कै. विश्वास वसंत पिसोळकर मयत तर्फे वारस,
५.१. श्रीमती. भावना विश्वास पिसोळकर, उ.व. - ६२, धंदा - वकीली
५.२. कु. चेतना विश्वास पिसोळकर, उ.व. - ३५, धंदा-वकीली
दोन्ही राहणार-प्लॉट नं. जी - २, पितृछाया अपार्टमेंट, स्नेहनगर, स्टेशनरोड, धुळे, ता. जि.धुळे
६. कै. श्रीनिवास वसंत पिसोळकर - अविवाहित मयत

.....अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही **.....सामनेवाला**

कै.सुमन वसंत पिसोळकर - (मृत्यू दिनांक - २९/१२/२०१५)
कै. वसंत बाळकृष्ण पिसोळकर - (मृत्यू दिनांक - १७/११/२००६)

.....मयत

ज्याअर्थी वरील अर्जदार हे कै. सुमन वसंत पिसोळकर ह्या दिनांक २९/१२/२०१५ रोजी साक्री, ता.साक्री, जि. धुळे व कै. वसंत बाळकृष्ण पिसोळकर हे दिनांक १७/११/२००६ रोजी साक्री, ता.साक्री, जि.धुळे येथे मयत झाले आहेत. मयतांचे वारस म्हणजे अर्जदार यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायालय, क.स्तर, यांचे न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६१/२०२३ अन्वय अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जाबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तकार असल्यास त्यांनी मे. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क्र. १ यांचे न्यायालयात दिनांक २८/०७/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ खंड २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांच्या लाभात देण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि.२०/०६/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक - २०/०६/२०२३

क. लिपीक
कामगिरी कारकुन, साक्री

(शिक्का)

आदेशावरुन
सहायक अधिक्षक
सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री

न्यूज कॉलम

चुडाणे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप

धुळे । शिक्षणाच्या प्रवाहातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे बाहेर पडत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत असणाऱ्या पुणे येथील ज्ञानज्योती फाऊंडेशन या संस्थेकडून शैक्षणिक चळवळ उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चुडाणे ता.शिंदखेडा येथील गरजू व वंचित विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने दूरेघी, एकेरी, चौकट वह्या, ड्रॉइंग बुक पेन, पेन्सिल इत्यादी शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. दातृत्वाचा फार उदोउदो न करता केवळ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचे निस्वेथ धेय्य ठेवून कार्य करणाऱ्या साहित्याचे वाटप चुडाणे येथील शाळेत छोटेखानी याप्रसंगी नवल उमाळे, शाळेचे मुख्याध्यापक गोकुळ पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कोळी, उपशिक्षक सुनिल मोरे व पालक उपस्थित होते.

विष सेवनातून एकाची आत्महत्या

धुळे । बिलाडी (ता. धुळे) गावातील गोपीचंद लक्ष्मण भिल (वाघ) (वय ३५) याने विषारी औषध सेवन केले. त्याला अत्यवस्थ स्थितीत हिरे रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. याबाबत धुळे ताळुका पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

यंदा चटकदार लोणच्याला महागाईची झळ

धुळे । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील गृहिणींची घरगुती चटकदार लोणचे बनविण्यासाठी लगबग जोरात सुरू झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत कैरीचे व त्यासाठी लागणाऱ्या मसाल्याचे भाव वाढल्याने चटकदार लोणच्याला महागाईचा झळ बसल्याने घरचे गावरान लोणचं यंदा काहीसे तिखट होणार आहे

मराठमोळ्या जेवणाच्या ताटात आंबट, गोड, तिखट तसेच चटकदार कैरीचे लोणचे असल्याशिवाय जेवणाला रंगत येत नाही. यावर्षी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारा, गारपीट यामुळे आंब्याचा मोहोर उशिरा तसेच कमी प्रमाणात लागला आहे. वादळी वाऱ्यासह पावसामुळे लगडलेल्या गावरान कैरीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे कैरी भाव खात आहे. मसाल्याच्या किमतींत मोठ्या प्रमाणात वाढल्याने घरगुती गावरान लोणचं बनवायला येणारा खर्चात यावर्षी वाढ झाली आहे.

बाजारात विविध प्रकारचे लोणचे मिळत असले तरी घरगुती गावरान आंब्यापासून तयार केलेल्या लोणच्याची चवच न्यारी असल्याने गृहिणींचा घरीच लोणचं तयार करण्याकडे कल असतो. जेवणात लज्जत वाढवणारा पदार्थ लोणचं यावर्षी गावरान आंब्यावरील कमी प्रमाणात उरलेल्या कैऱ्यामुळे अनेक गृहिणीकडून आता कलमी कैरीकडे ओढ निर्माण झाली आहे. आंब्याच्या हंगामात बाजारात आंबे मोठ्या प्रमाणात विक्रीस येतात. पनवेल व परिसरात पूर्वी बहुतांशी शेतकऱ्यांच्या शेतात, बांधावर आंब्याची झाडे होती. त्या वेळी बाजारात व गावात सर्वत्र गावरान आंबे मोठ्या प्रमाणात मिळायचे. मात्र, शहरीकरणाच्या ओघात शेतीमध्ये घट झाली आहे.

आंब्याचे झाडे अगदीच कमी प्रमाणात शिल्लक राहिली असल्याने यंदा मोजक्याच आंब्याच्या झाडांना मोहोर आलेला दिसत आहे. त्यामुळे यंदा गावरान आंबे कमी प्रमाणात चाखायला मिळतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. उन्हाळ्याच्या दिवसात गावरान आंबा हा शरीरासाठी पोषक मानला जातो. त्यामुळे घराघरांत जेवणावळीला आंब्याचा रस बनतोच, त्यात गावरान आंब्याचा रस असल्यास जेवणाची लज्जत काही वेगळीच असते. त्यामुळे शरीरासाठी पौष्टिक आंबा उन्हाळ्यात खायलाच हवा, असे जुनेजाणत्या मंडळींकडूनदेखील सांगितले जाते. मात्र, यंदा मोजक्याच झाडांना मोहोर आल्याने आंबा मिळणार नसल्याचे दिसत आहे. लोणच्यासाठी खिशाला कात्री गृहिणींकडून लोणचे तयार करण्याची लगबग सध्या सुरु असून त्यासाठी लागणाऱ्या गावरान कैरीची जागा आता इतर आंब्याच्या कैऱ्यांनी घेतली आहे. लोणचे तयार करण्यासाठी लागणारा गरम मसाल्याचे भाव वाढल्याने लोणचे तयार करण्यासाठी खिशाला कात्री लागत आहे.

खर्चात वाढ

गावराण कैरीचे लोणचे बनविण्यासाठी लागणाऱ्या कैरी, तेल आणि मसाल्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढल्याने घरगुती लोणचं बनवायला येणाऱ्या खर्चात दुप्पटीने वाढ झाली आहे. वादळी वाऱ्यामुळे गावराण कैरीचे उत्पादन घटल्याने यंदाच्या वर्षी कैरीच्या किमतीत वाढ झाली आहे.

आमच्या शेतात तीसहून अधिक कलमी तसेच गावरान आंबे लागवड केली आहेत. मात्र वातावरणात बदल व अवकाळी पाऊस, वादळात आंब्यावरील मोहर गळून पडल्याने लोणच्याची कैरी बाजारातून विकत घ्यावी लागली आहे. त्यात भाववाढीमुळे खर्चात वाढ झाली आहे.

- गृहिणी

दरवर्षी लोणच्यासाठी गावरान कैरीचा वापर करीत असते. मात्र या वर्षात गावरान कैरी कमी प्रमाणात दिसून येत असल्याने कलमी आंब्यापासून लोणच तयार करावे लागत आहे. यावर्षी गावरान आंब्यावरील कमी प्रमाणात उरलेल्या कैऱ्यामुळे अनेक गृहिणीकडून आता कलमी कैरीकडे ओढ निर्माण झाली आहे.

- गृहिणी

कैरी फोडण्यासाठी १० रूपये

बाजार समिती व शहर पोलिस चौकीजवळ कैरी विक्री करणाऱ्यांकडून कैऱ्या फोडून दिल्या जातात. १० रूपये किलोप्रमाणे कैरी फोडून दिली जाते आहे. मसाल्यासोबतच कैर्यांच्या दरवाढीचाही फटका गृहिणींना सहन करावा लागणार आहे.

साक्री न्यायालयात राजर्षी शाहु महाराज जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन साजरा

साक्री । प्रतिनिधी

साक्री न्यायालयात विधी सेवा समिती, साक्री व साक्री तालुका वकिल संघाच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहु महाराज जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन न्यायाधीष कैलास अढायके, प्रमुख पाहुणे म्हणुन न्यायाधीष आर. बी. डोळे, एन. एल. पाटील, वकिल संघाचे अध्यक्ष वाय. पी. कासार उपस्थित होते. यावेळी सर्व वकिल संघाचे सदस्य, न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार देखील उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करुन राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. ॲड. वाय. पी. कासार यांनी आपल्या भाषणात शाहू महाराजांच्या कार्याची थोरवी सांगितली. या महामानवांचे प्रागतिक विचार हेच देशाला व देशातील प्रत्येक लहान लहान घटकाला पुढे नेऊ शकतात असे प्रतिपादन केले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश कैलास अढायके यांनी राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या विचारांची आज देशाला खर्या अर्थाने गरज आहे. या महामानवांचे प्रागतिक विचार हेच देशाला व देशातील प्रत्येक लहान लहान घटकाला पुढे नेऊ शकतात असे प्रतिपादन केले. शाहू महाराजांच्या जीवनातील प्रसंगांचे वर्णन करुन त्यांचे कार्य उपस्थितांना सांगितले. या महामानवांच्या त्याग आणि संघर्षामुळे आज आपण सारे स्वतंत्रपणे जगू शकतो, याची जाण प्रत्येकाने ठेवायला हवी. सामाजिक समतेचा विचार हाच राष्ट्रीय विचार आहे. छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या जीवनकाळात राबविलेल्या विविध योजना ह्याच आजच्या सामाजिक न्यायाच्या योजनांचा आधार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्षन श्री. योगेष षिरसाठ यांनी केले.

बैलगाडीवर धडकून दुचाकीस्वार गतप्राण

धुळे । तिसगाव (ता. धुळे) गावात रस्त्यावर उभ्या बैलगाडीवर भरधाव दुचाकी धडकून दुचाकीस्वार जागीच ठार झाला. याबाबत त्याचा भाऊ सुदाम भामरे यांच्या माहितीवरून पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात नोंद झाली. दीपक बापू भामरे (वय ३०, रा. तिसगाव) असे मृताचे नाव आहे. तो दुचाकीने (एमएच १८, बीवाय ५८०६) भरधाव जाताना गावातील नथ्थू भिवसन हाटकर यांच्या घरासमोर उभ्या बैलगाडीला धडकला. त्यात त्याच्या डोक्याला व शरीराला दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २३ जूनला संध्याकाळी साडेसातच्या सुमारास घडली. याबाबत त्याचा भाऊ सुदाम भामरे यांच्या माहितीवरून पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात नोंद झाली.

कन्येच्या मंगल परिणयप्रसंगी विहारासाठी दिले धम्मदान

शिरपूर । प्रतिनिधी

येथील वकील संघाचे उपाध्यक्ष आयु. ड. युवराज विठ्ठल ठोंबरे व सौ. कमलबाई युवराज ठोंबरे यांनी आपली सुकन्या रिना हिच्या मंगल परिणय सोहळाप्रसंगी नरडाणा येथील प्रगतीपथावर असणाऱ्या नालंदा बुद्ध-विहार साठी रु. ५ हजारचे धम्मदान स्वेच्छेने विहार समिती सदस्य यांच्याकडे परिणय मंचावरच सुपुर्द केलेत. नानासाहेब ड. ठोंबरे हे सदर विहाराच्या बांधकामासाठी प्रथम पासूनच मदत करीत आहेत. हे स्वतः दुसऱ्यांदा धम्मदान देत आहेत. स्वतः पुढाकार घेऊन समाजातूनसुद्धा निधी गोळा करण्यास मदत करीत असतात. उपासिका रिना व उपासक तुषार यांना आपले भावी वैवाहिक जीवन, गृहस्थाश्रमीचे आयुष्य हे सुखाचे समृद्धीचे, भरभराटीचे व आरोग्यदायी लाभो, अशी तथागत बुध्दचरणी प्रार्थना करण्यात आली.

मखमलाबादरोड परिसरात गढूळ पाणी

नाशिक । मलाबादरोड परिसरातील वृंदावन कॉलनी परिसरात गेल्या पाच दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे अनेक नागरिकांना पोटदुखी, जुलाब अशा आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. याबाबत तक्रारी करूनही पालिकेचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. मोठ्या नागरी वस्तीचा परिसर म्हणून मखमलाबाद परिसर ओळखला जातो. या परिसरात अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने आधीच नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

भाजप पिंपळनेर मंडळातर्फे मोदी @९ महासंपर्क अभियान

सामोडे । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी पिंपळनेर मंडळा तर्फे पिंपळनेर येथे आणीबाणी काळा दिवस म्हणून पाळण्यात आला.व घर घर चलो अभियानाला हि सुरुवात करण्यात आली. त्यावेळेस भाजपाचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब संभाजीराव पगारे, साक्री तालुका विधानसभा प्रमुख व पिंपळनेर मंडल अध्यक्ष रावसाहेब मोहन सूर्यवंशी, साक्री विधानसभा मोदी९ संयोजक वसंत आप्पा बच्छाव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.व मंडल सरचिटणीस रामकृष्ण तात्या एंखडे यांनी सुत्रसंचलन व आभार व्यक्त केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब प्रदिप कोठावदे, जेष्ठ नेते श्री छगनकाका बाविस्कर, बापु माळचे, जिल्हा चिटणीस श्री मोतीलाल पोतदार, सरचिटणीस श्री प्रमोद भैय्या गांगुर्डे, इंजि. विजय नंदन ,प.स.सदस्य देवेंद्र गांगुर्डे, शामनाना पगारे, शेखर बाविस्कर, पंकज भावसार, अनिल जाधव, रामकृष्ण सोनवणे, योगेश वाघ, अनिल दादा मुसळे, रवि भावसार, महालेसर, मनोज सोनवणे, कल्पेश नेरकर, सुभाष नेरकर, संजय भिलाणे, विनोद अहिरराव, आबा पगारे, दिलीप घरटे, भाऊसाहेब एखंडे, राकेश बदामे, डॉ.भुषण एखंडे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरीक उपस्थित होते.

आम आदमी पार्टीचा 'स्वराज्य संवाद' उपक्रम काठे गल्लीत उत्साहात

नाशिक । प्रतिनिधी

आम आदमी पार्टीचे महाराष्ट्र प्रभारी गोपाल इटालिया यांच्या मार्गदर्शनातून पश्चिम महाराष्ट्रात स्वराज्य यात्रा संपन्न झाली. या यात्रेत महाराष्ट्रातून जवळपास ५००० कार्यकर्ते सहभागी झाले होते. एकादशीच्या मुहूर्तावर पंढरपूरच्या विठोबा रखुमाईचे दर्शन घेऊन, महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर नवीन महाराष्ट्र घडवण्यासाठी 'पंढरपूर ते रायगड' असा स्वराज्य यात्रेचा प्रवास होता.

स्वराज यात्रा एकूण १० दिवस पंढरपूर ते रायगड असा एकूण ७८० किलोमीटर प्रवास करत पश्चिम महाराष्ट्रातील ५ व कोकणातील २ जिल्हे असे एकूण ११ लोकसभा व ६० पेक्षा जास्त विधानसभा मतदार संघातून मार्गक्रमण करत गेली. ही यात्रा संपल्यानंतर आम आदमी पार्टीने लगेचच संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यात जिल्ह्यात आणि गावात स्वराज संवादाचा राज्य उपक्रम चालू केला. आज संपूर्ण महाराष्ट्रात हा उपक्रम सुरू आहे त्याच धर्तीवर काठे गल्ली येथे आम आदमी पार्टीचे प्रसिद्धीप्रमुख चंदन पवार आणि युवा आघाडी अध्यक्ष अमर गांगुर्डे यांनी 'स्वराज्य संवाद' आयोजित केला होता, यात लोकांना दिल्ली आणि पंजाब मधील योजनांची माहिती देण्यात आली. तसेच प्रभागातील ज्या समस्या आहेत त्यावर लवकरच आम आदमी पार्टी प्रशासनाशी पत्रव्यवहार करून सोडवतील असे आश्वासन देण्यात आले.

या स्वराज्य संवादासाठी महाराष्ट्र सह-प्रभारी गोपाल ईटालिया, माजी उपाध्यक्ष तथा नाशिक प्रभारी धनराज वंजारी आणि माजी राज्यसचिव धनंजय शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी समन्वय समितीचे योगेश कापसे, गिरीश उगले पाटील, प्रभाकर वायचळे, तसेच पदाधिकारी श्वेतांबरी आहेर, स्वप्निल घिया, स्वराज्य संवाद उत्तर महाराष्ट्र समन्वयक अभिजीत गोसावी, प्रदीप लोखंडे, अमोल लांडगे, अनिल कौशिक, नविंदर अहलूवालिया, दिपक सरोदे, जयश्री जाधव, फैजान आझाद आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रभागातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

शिरढाने प्र डांगरी येथे पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

धुळे । प्रतिनिधी

जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक कुटुंबापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी हर घर जल, हर घर नल योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी केले. खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या हस्ते धुळे तालुक्यातील शिरढाने प्र डांगरी येथे सत्तर लक्ष रुपये खर्चाच्या पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनियर अश्विनी पाटील या होत्या.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव, उपसरपंच चुडामन यशवंत पाटील,, श्री ईश्वर नाना पाटील, श्री रवींद्र पाटील, रोहिदास पाटील, शांताराम पाटील, रतिलाल पाटील ,किसन पाटील, शत्रुघ्न पाटील, शाखा अभियंता सैंदाणे, किशोर पाटील, ग्रामसेविका सुरेखा पाटील आदी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत धुळे तालुक्यातील शिरढाने प्र.डांगरी येथे गावालगत पांझरा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा आहे. मात्र तेथील पाणी पिण्यायोग्य नव्हते. गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा याबाबत ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेऊन जल जीवन मिशन अंतर्गत रुपये सत्तर लक्ष खर्चाच्या योजनेस मंजुरी देण्यात आली. या योजनेअंतर्गत विहीर खोदून सुमारे पन्नास हजार लिटर पाण्याच्या टाकीची बांधकाम, वितरण व्यवस्था,करण्यात येणार आहे. तसेच गावाबाहेरील आदिवासी वस्तीपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी देखील वितरण व्यवस्थेचे काम या योजनेअंतर्गत केले जाणार आहे. या कार्यक्रमात बोलताना खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी धुळे तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या गावांची माहिती घेऊन आवश्यकता उपायोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. जिल्हा परिषद अध्यक्ष इंजिनिअर सौ. अश्विनीताई पाटील बोलताना म्हणाल्या की ,पाणी टंचाईचा

खरा त्रास हा महिला भगिनींना होत असतो. याची मला जाणीव आहे त्यांचा त्रास दूर होऊन गावाची पाणी समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आम्ही प्राधान्य क्रमाने जल जीवन मिशन योजनेचा पाठपुरावा करत आहोत. आगामी काळात पाणी समस्या सुटलेली आपणास दिसेल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

प्राध्यापक अरविंद जाधव यांनी सांगितले की, गावातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी आणि शाश्वतरित्या सोडविण्यावर आमचा भर आहे. तेव्हा योजना करून चालणार नाही तर त्या योजनेची फलनिष्पत्ती देखील दिसली पाहिजे. म्हणून पुरेसा अभ्यास करून आणि ग्रामस्थांची भावना, त्यांची मते विचारात घेऊन काम सुरू असल्याने त्याचा सकारात्मक परिणाम दिसत असल्याचे यावेळी सांगितले.

जिल्हा रुग्णालयातील इमारतीस दीड कोटी : खासदार डॉ.भामरे

धुळे । प्रतिनिधी

येथील सुरत बायपासवरील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जिल्हा सर्वोपचार रुग्णालयाचे शवविच्छेदनगृह अत्याधुनिक होणार आहे. याकामी खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या पाठपुराव्याअंती इमारत बांधकामासाठी एक कोटी ५५ लाख १५ हजार ४२५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री गिरीश महाजन यांचे खासदार डॉ. भामरे यांनी आभार मानले.

धुळे जिल्ह्यासह सीमेलगतच्या नंदुरबार, जळगाव, नाशिक जिल्ह्यातील अनेक गावांसाठी हिरे वैद्यकीय महाविद्यालयाचे जिल्हा सर्वो पचार रुग्णालय वरदान ठरते. रुग्णांना वैद्यकीय सुविधा, उपचार पुरविण्यासाठी हिरे महाविद्यालयासह रुग्णालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. रुग्णालयाच्या विविध सोयी-सुविधांमध्ये वाढ करून सर्वसामान्य जनतेला चांगले उपचार मिळावेत, आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्नशील असल्याचे खासदार डॉ. भामरे यांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयाच्या शवविच्छेदनगृह इमारतीच्या श्रेणीवर्धन बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी हिरे वैद्यकीय महाविद्यालय व्यवस्थापनाने केली. त्यानुसार खासदार डॉ. भामरे यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्यांनी पालकमंत्र्यांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देत निधी उपलब्धतेची मागणी केली. तसेच वेळोवेळी भेट घेत पाठपुरावाही केला. त्यास यश मिळून राज्यातील भाजप-शिवसेना युती सरकारने भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न जिल्हा सर्वोपचार रुग्णालयाच्या शवविच्छेदनगृह इमारतीच्या आधुनिकीकरण आणि बांधकामासाठी एक कोटी ५५ लाखांवर निधी दिला आहे. तसे पत्र हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास प्राप्त झाले आहे. यात अत्याधुनिक पद्धतीने शवविच्छेदनगृह तयार केले जाईल. याकामी शासनातर्फे लवकर निविदाप्रक्रिया राबविली जाईल, असे खासदार डॉ. भामरे यांनी सांगितले. याकामी खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या पाठपुराव्याअंती इमारत बांधकामासाठी एक कोटी ५५ लाख १५ हजार ४२५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

नाशिककरांनी अनुभवले सावरकरांचे देशप्रेम

नाशिक

। मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या हर घर सावरकर संकल्पने अंतर्गत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या पुढाकाराने व आदेशाने महाकवी कालिदास कलामंदिर, शालिमार, नाशिक येथे 'सागरा प्राण तळमळला' या नाटकाचा विनामूल्य प्रयोग नाशिककर रसिकांसाठी व सावरकर प्रेमींसाठी शिवसेना नाशिक महानगरांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे, सह संपर्क प्रमुख राजू लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, खा. हेमंत गोडसे, महानगर प्रमुख प्रवीण तिदमे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना, युवासेना विद्यार्थी सेना नाशिक महानगराच्यावतीने यशस्वी आयोजन करून प्रचंड संख्येने प्रयोग हाऊसफुल झाला. या नाट्यप्रयोगा दरम्यान नाट्यरसिकांचा व सावरकर प्रेमींचा प्रतिसाद वाखाणण्याजोगा होता. सावरकरांचे विचार घरोघरी पोहोचवणे या प्रामाणिक जाणिवेतून ही मोहीम सुरू आहे. सावरकर आणि हिंदुत्व फक्त एखाद्या प्रसंगापुरते - राजकारणासाठी वापर न करता एखादे व्रत घेतल्याप्रमाणे सावरकरांच्या विचारांचा जागर हा कायम सुरूच आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त नाशिक शिवसेनेच्या वतीने भगवा महिना हा उपक्रम साजरा केला जात आहे. या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून देशासाठी बालवयातच स्वातंत्र्यवीर व त्यांच्या कुंटूबियांनी घरादारावर तुळशीपत्र ठेवत स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात जीवन समर्पित केले. मधुसूदन कालेलकर यांनी सन १९७७ मध्ये लिहिलेले हे नाटकाने अल्पावधीतच रसिकांना मंत्रमुग्ध केले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

मंगळवार, दि. २७ जून २०२३

लाखो भाविक पंढरपुरात : चंद्रभागेच्या तिरी वारकऱ्यांची मांदियाळी

पंढरपूरमध्ये वारकऱ्यांचा सोहळा पाहायला मिळत आहे. आषाढी वारीसाठी लाखो भाविक पंढरपूरध्ये दाखल झाले आहेत. सध्या पंढरपूरमध्ये वारकऱ्यांचा सोहळा पाहायला मिळत आहे. आषाढी वारीसाठी लाखो भाविक पंढरपूरध्ये दाखल झाले आहेत. लाखो वारकरी पंढरीच्या दिशेनं जात आहेत.भाविकांना चंद्रभागेच्या मुबलक पाण्यात आपले पवित्र स्नान करता यावं यासाठी उजनी धरणातून नदीत सोडलेलं पाणी सोडलं आहे. हे पाणी चंद्रभागेत पोहोचलं आहे. पंढरपुरात वासुदेव देखील विठ्ठलाच्या नामघोषात तल्लीन झाले आहेत.गावोगावच्या दिंड्या पंढरपुरात दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. लाखो वारकरी पंढरपुरात दाखल झाले आहेत. वारकरी हरीनामाच्या घोषात तल्लीन झाले आहेत. पण यंदा परिस्थिती पूर्वपदावर असल्याने पूर्वीप्रमाणेच वारीचा उत्साह अवघ्या पंढरीत दाटलेला दिसतो. राज्याच्या विविध भागांसह कर्नाटक आणि तेलंगणामधूनही वारकरी येत आहेत. शहरातील विविध देवदेवतांची मंदिरे, धर्मशाळा, मठांमधून भजन-भारुडे सुरू आहेत. अनेक ठिकाणी प्रवचने आणि कीर्तने रंगली आहेत. चंद्रभागा नदीच्या किनारीही ज्ञानोबा-तुकारामांसह माऊली, माउली असा जप सुरू आहे. चंद्रभागेतील दशमीच्या स्नानाला विशेष महत्त्व असल्याने गुरुवारी (ता. ३) भल्या पहाटेपासूनच नदीवर वारकऱ्यांची स्नानासाठी दिवसभर झुंबड उडाल्याचे चित्र होते.

गुलाल-बुक्क्यासह प्रासादिक वास्तूंची दुकाने, गृहोपयोगी साहित्य, लहान मुलांची खेळणी यांसह विविध प्रकारची दुकाने थाटल्याने खरेदीसाठी इथे गर्दी दिसत आहे.

ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील